# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(सामान्य प्रशासन विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## निवडणूक संबंधी अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१७/९ दिनांक: २९ सप्टेंबर २०१७

विद्यापीठाद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/२०१७/६, दिनांक २८ ऑगस्ट २०१७ नुसार निवडणूक २०१७ साठी अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ या निर्वाचक गणाच्या तात्पुरत्या मतदार याद्या दिनांक २९ सप्टेंबर २०१७ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election 2017** या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आल्या असून निवडणूक कक्षाच्या सूचना फलकावर सुद्धा उपलब्ध आहेत. सदर निर्वाचक गणाच्या तात्पुरत्या मतदार यादीवर कुलसचिवांकडे आक्षेप नोंदविण्याचा अंतीम दिनांक ३ ऑक्टोबर २०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे.

यासंदर्भात सर्व संबंधीतांना सूचित करण्यात येते की, दिनांक ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत कार्यालयीन अवकाश आहे. सदर कालावधीत कार्यालयीन अवकाश असला तरी विद्यापीठाद्वारे दिनांक २८ ऑगस्ट २०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये जाहिर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार वरील निर्वाचक गणाच्या तात्पुरत्या मतदार यादीवर संबंधीतांचे आक्षेप नोंदविण्यास्तव **विद्यापीठाचे निवडणूक कक्ष वरील अवकाश कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सुरू राहील**, कृपया याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव व
निवडणूक निर्णय अधिकारी

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे प्रमुख, संचालित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व विद्यापीठ परिसंस्थांचे सचालक.
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित, स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्थांचे सर्व प्राचार्य/संचालक.
३. सर्व शाखा प्रमुख व अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.
४. डॉ. विणा प्रकाशे, माहिती शास्त्रज्ञ (प्राध्यापक श्रेणी), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.

यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(वसीम अहमद)
उपकुलसचिव (सा.प्र.)
(अति. कार्यभार)